2023 III 25 - 1100

२०२३ . ०३ . २५ ११००

# N 964

Seat No. / बैठक क्र. [ ]

Time : 2 Hours
वेळ २ तास

## SOCIAL SCIENCES (73) GEOGRAPHY PAPER-II (M)
## सामाजिक शास्त्रे (७३) भूगोल पेपर-२ (म)

(REVISED COURSE)

Pages - 7
पृष्ठे - ७

Total Marks : 40
एकूण गुण - ४०

सूचना :—

(1) *सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.*

(2) *उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*

(3) *प्रश्न क्रमांक 4(अ) साठी पुरविण्यात आलेल्या भारत नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

(4) *प्रश्न क्रमांक 6(अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.*

(5) *प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.*

(6) *प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.*

(7) *प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.*

(8) *आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.*

(9) *पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.*

1. **अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा :** 4

(1) अरबी समुद्रातील लक्षद्वीप बेटे ही .................... आहेत.

(*i*) मुख्य भूभागापासून तुटलेला भूभाग

(*ii*) प्रवाळ बेटे

(*iii*) ज्वालामुखीय बेटे

(*iv*) खंडीय बेटे

(2) ब्राझील हा दक्षिण अमेरिका खंडातील .................... लोकसंख्या असलेल्या ५ ।हे.

(*i*) कमी

(*ii*) मध्यम

(*iii*) अत्यल्प

(*iv*) सर्वांत जास्त

(3) वस्त्यांचे केंद्रीकरण .................... या प्रमुख बाबींशी निगडित असते.

(*i*) समुद्रसान्निध्य

(*ii*) मैदानी प्रदेश

(*iii*) पाण्याची उपलब्धता

(*iv*) हवामान

(4) भारत व ब्राझील या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था .................... प्रकारची आहे.

(*i*) अविकसित

(*ii*) विकसित

(*iii*) विकसनशील

(*iv*) अतिविकसित

2. **योग्य जोड्या जुळवा :** 4

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (1) ट्रान्स ॲमेझोनियन मार्ग | (अ) साग |
| (2) काटेरी व झुडपी वने | (ब) फुटबॉल |
| (3) मैदानी प्रदेश | (क) प्रमुख रस्ते मार्ग |
| (4) ब्राझीलमधील लोकप्रिय खेळ | (ड) खेजडी |
| | (इ) पंजाब |
| | (ई) क्रिकेट |

3. **थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही *दोन*) :** 4

(1) क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य

(2) ब्राझीलची किनारपट्टी

(3) भारतातील खाणकाम

4. (अ) **भारताच्या नकाशा आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा (कोणतेही *चार*) :** 4

(1) केंद्रशासित प्रदेश – दमण

(2) पश्चिम घाटातील जास्त पर्जन्याचा प्रदेश

(3) शीत वाळवंट

(4) उत्तरेकडील जास्त लोकसंख्येची घनता असलेला प्रदेश

(5) कन्याकुमारी

(6) चिल्का सरोवर

(आ) खालील ब्राझीलच्या नकाशाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार) : 4




प्रश्न :

(1) ब्राझीलमधील प्रमुख नदी कोणती ?

(2) ब्राझीलमधील मुख्य बेट कोणते ?

(3) उरुग्वे नदी कोणत्या दिशेकडे वाहते ?

(4) साओ फ्रान्सिस्को नदी कोणत्या महासागरास येऊन मिळते ?

(5) उत्तर अटलांटिक महासागराला मिळणाऱ्या कोणत्याही एका नदीचे नाव लिहा.

5. **भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) :** 6

(1) ब्राझीलमधील लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.

(2) ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा अधिक विकास केला जात आहे.

(3) हिमालयाच्या उंच भागात वनस्पतींची संख्या विरळ आढळते.

(4) ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.

6. (अ) **खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख तयार करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** 6

**सरासरी आयुर्मान — भारत**

| वर्ष | सरासरी आयुर्मान |
|---|---|
| 1980 | 54 |
| 1990 | 58 |
| 2000 | 63 |
| 2010 | 67 |
| 2016 | 68 |

**प्रश्न :**

(1) 1990 मध्ये सरासरी आयुर्मान किती आहे ?

(2) कोणत्या दोन दशकात सरासरी आयुर्मानात समान वाढ झाली आहे ?

(3) 1990 ते 2016 या काळात सरासरी आयुर्मानात कितीने वाढ झाली ?

किंवा

(आ) खालील आलेखाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 6



प्रश्न :

(1) वरील आलेखाचा प्रकार कोणता ?

(2) या आलेखात कोणत्या बाबी दर्शविल्या आहेत ?

(3) कोणत्या वर्षी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाची टक्केवारी सारखी आहे ?

(4) 2010 मध्ये भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न किती टक्के आहे ?

(5) 2000 मध्ये कोणत्या देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाची टक्केवारी जास्त आहे ?

(6) 2016 मध्ये भारत व ब्राझील यांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात किती टक्क्यांचा फरक आहे ?

7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : 8

(1) भारत आणि ब्राझील या देशांत नागरीकरणाबाबत तुलनात्मक आढावा घ्या.

(2) भारताची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

(3) क्षेत्रभेटी वेळी नदी प्रदूषण होवू नये म्हणून तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?